# मंगलाताई भागवत फाऊंडेशन

**वेळ : ३ तास** **विषय : मराठी (कुमारभारती)** **गुण : ८०**

**सूचना :**

१. दिलेल्या सूचनांनुसार आकलन कृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

२. आकृत्या पेनानेच काढाव्यात.

३. उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन)आकृत्या काढण्याची आवश्यकता नाही. तसेच त्या कृती लिहून घेऊ नयेत.

४. विभाग–५ उपयोजित लेखन प्र.५(अ)(२)'सारांशलेखन' या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१(इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

५. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ : गद्य–पठित गद्य

**प्रश्न १अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

भारताचे अर्धांग जे स्त्रिया; त्याच अनपढ राहिल्या तर देश अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीसारखा होईल. एका बाजूला या देशाला आपण भारत 'माता' म्हणतो; सरस्वतीला आपण वाङ्मयाची जननी मानतो आणि दूसरीकडे स्त्री निरक्षक अज्ञानी ठेवतो, हा चीड आणणारा विरोधाभास त्यांना घालावयाचा होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी, जपानच्या धर्तीवर इ.स. १९१६ साली भारतातले पहिले महिला विद्यापीठ पाच स्त्रियांना दाखल करुन स्थापन केले. आगबोटीने प्रवास करणाऱ्या त्या जुन्या जमान्यात, महर्षी कर्व्यांनी जग प्रवास करुन स्त्री शिक्षणाचे माहात्म सर्वत्र बिंबवले. जगभर स्त्री शिक्षणाबद्दल सभा केल्या. स्त्री ही स्वाभिमानी असली पाहिजे, ती शिकली पाहिजे, उच्च विद्याविभूषित होऊन पुरुषांनी स्पर्धा करु शकली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांत त्यांना दोन कार्ये करावयाची होती. एका टोकावर, स्त्री साक्षर करणे हे जटिल कार्य व दुसऱ्या टोकावर, तिला पुरुषांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरवणे हे अटीतटीचे कार्य ! पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रियांवरील पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकावे हे महा कठीण काम होते. गुरुत्वाकर्षणाविरुद्ध पृथ्वी बाहेर पडणाऱ्या रॉकेटसारखीच क्षमता तेथे आवश्यक होती.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या शेरावली या गावी जन्मलेला हा मुलगा जन्म:च महर्षी किंवा भारत रत्न म्हणून गणला गेला नाही. आपल्या जगत्या आयुष्यात, हालअपेष्टांची तमा न बाळगता, एखादा मनुष्य केवढे अलौकिक कार्य करु शकतो. त्याची मिसाल आहेत डॉ. धोंडो केशव कर्वे. लोकमानसाने त्यांना अभिमानाने महर्षी मानले. राजमानसाने १९५८ साली, 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने, डोक्यावर घेतले.

**१)** **आकृतीबंध पूर्ण करा.** **(२)**

महर्षी कर्वे यांची स्त्रियांबद्दलची स्वप्ने



**२)** **एका शब्दात उत्तरे लिहा.** **(१)**

i) कर्व्यांचे जन्म गाव –

ii) कर्व्यांनी हाती घेतलेले महा कठीण काम –

iii) कर्वे यांना लोकमानसाने दिलेली पदवी –

iv) सर्वोच्च नागरी पुरस्कार –

**३)** **स्वमत– 'स्त्री शिक्षणाचे आजच्या काळातील महत्व' या विषयाबाबत स्वत:चे विचार स्पष्ट करा.** **(३)**

**आ)** **पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

पहिला टप्पा होता गिर्यारोहण प्रशिक्षणाचा. 'एम्स' मधून डिस्चार्ज मिळाला. साधारणपणे एखादा हात/पाय कापावा लागलेला पेशंटस् दिवसेंदिवस अगदी महिनोन्महिने उठत नाहीत. मी दोनच दिवसांत उभी राहिले. एका पायात घोट्याची हाडे तुटल्याने रॉड घातलेला, ज्याच्या हाडांची जुळणी अजून पुरी व्हायची होती. दुसरा पाय म्हणजे मांडीपासून खाली कृत्रिम पाय बसवलेला. असा माझा अवतार नि जोडीला भाईसाब– आम्ही पोचलो ते थेट बचेंद्री पाल यांच्याकडे. बचेंद्रजी म्हणजे एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला. त्याच एकमेव अशा होत्या, की ज्यांनी माझ्या ध्येयाचा आदर केला. मला प्रोत्साहन दिलं. त्या म्हणाल्या, अरुणिमा, तू अशा परिस्थितीत इतका मोठा निर्णय घेतलास... तुला ठाऊक आहे, तुझ्या आतलं एव्हरेस्ट तू केव्हाच सर केलं आहेस. आता तुला एव्हरेस्ट सर करायचं आहे ते फक्त स्वत:ला सिद्ध करायला, जगाला तू कोण आहेस ते दाखवून द्यायला!


'नेहरु गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्र' बहुधा आशिया खंडातील सर्वोत्तम असावं. इथे माझे दीड वर्षांसाठी खडतर प्रशिक्षण सुरु झाले. छोटे पण बऱ्यापैकी धोकादायक पर्वत चढणे, जवळपास मरणप्राय कठीण अनुभव, ध्येयापासून विचलित करू पाहणारे कष्टदायी प्रशिक्षण यांतून मी तावून सुलाखून निघत होते.

१)	**एका शब्दात उत्तरे लिहा.** **(२)**

i) अरुणिमावर उपचार झाले ते रुग्णालय –

ii) एव्हरेस्ट सर करणारी पहिला महिला –

२)	**कृती पूर्ण करा : नेहरु गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्रातील अरुणिमाचे खडतर अनुभव** **(२)**



३)	**स्वमत :– अरुणिमा – आमच्यासाठी आदर्श यावर स्वत:चे विचार स्पष्ट करा.** **(३)**

## अपठित गद्य

**प्र.१इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

जीवनात प्रत्येकाचा प्रयत्न आनंद होण्यासाठी चालू असतो. अनेक प्रकारच्या संकटांनी ग्रस्त व त्रस्त झालेली माणसे दु:खी असावीत, यात आश्चर्य ते काय ? पण जीवनातील सर्व सुविधांची सुबत्ता ज्यांच्या जवळ आहे, अशी सधन माणसेही दु:खाचीच कहाणी सांगतात. अनेक बाह्य कारणांनी स्वत:ला माणसे दु:खी बनवीत असतात. विवेकानंदाच्या मते, अहंकार रहितता व स्वार्थ निरपेक्षता याशिवाय आनंद प्राप्ती होणार नाही.

मनुष्य मूर्खपणाने व स्वार्थाने स्वत:लाच केवळ आनंदी बनवण्याचा विचार करतो. त्यासाठी वर्षानुवर्षे पराकाष्ठा करतो; पण खरा आनंद स्वार्थाला मारण्याने मिळणार आहे. आनंदी होण्यासाठी इतरत्र धावण्याची गरज नाही. स्वार्थी वृत्ती अशी आहे की, स्वार्थांमध्ये बाधा आल्यास ती दु:खी बनवते. त्यामुळे ती स्वार्थी वृत्तीच त्यागावी. हा आनंदी होण्याचा उपाय ठरेल, असे ते म्हणतात.


१)	**उत्तरे लिहा.** **(२)**

i) आनंदी होण्याचा उपाय लिहा –

ii) जीवनात चालू असलेला प्रत्येकाचा प्रयत्न लिहा –

२)	**आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**

आनंद प्राप्तीसाठी आवश्यक बाबी



**विभाग – २ पद्य**

**प्रश्न २.अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.** **(२)**

i) कवितेच्या आधारे पुढील विधाने योग्य/अयोग्य ते लिहा.

ii) सकारात्मक रहा ii) उतावळे व्हा iii) खूप हुरकून जा iv) संवेदनशीलता जपा

खोद आणखी थोडेसे
खाली असतेच पाणी
धीर सोडू नको, सारी
खोटी नसतात नाणी.

मूठ मिटून कशाला
म्हणायचे भरलेली
उघडून ओंजळीत
घ्यावी मनातली तळी.

घट्ट मिटू नये ओठ
गाणे असते गं मनी
आर्त जन्मांचे असते
रित्या गळणाऱ्या पानी.

झरा लागेलच तिथे
खोद आणखी जरासे
उमेदीने जगण्याला
बळ लागते थोडसे !

**२) कवितेतील पुढील संकल्पना आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.** **(२)**

| **कवितेतील संकल्पना** | **संकल्पनेचा अर्थ** |
|---|---|
| i) मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली | i) मनातील सामर्थ्य व्यापक बनवावे |
| ii) उघडून ओंजळीत घ्यावी मनातील तळी | ii) सगळे लोक फसवे नसतात |
| | iii) भ्रामक खोट्या समजुती बाळगू नयेत |

**३) पुढील पद्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.** **(२)**

खोद आणखी थोडसे, खाली असतेच पाणी,
धीर सोडू नको, सारी, खोटी नसतात नाणी

**४) काव्य सौंदर्य** **( )**

'झरा लाभे लच तिथे खोद आणखी जरासे' या ओळीतील विचार सौंदर्य स्पष्ट करा.

**प्र.२.आ) दिलेल्या मुद्यांच्या आधारे पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी कृती सोडवा.**

| **मुद्दे** | **'वस्तू' किंवा आकाशी झेप घे रे** | | |
|---|---|---|---|
| i) प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री – | ....... | ....... | **(१)** |
| ii)प्रस्तुत कवितेच विषय – | ....... | ....... | **(१)** |
| iii)प्रस्तुत कवितेतून मिळ | ....... | ....... | **(२)** |

इ) **रसग्रहण :** **(४)**

’पुढे दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.

भातुकलीतून प्रवेशताना वास्तव्यात हातात हात असेल दोघांचाही

ज्यावर सहज विसावेल बाहुली आणि चेंडू जोडीनं !’

## विभाग – ३ स्थूलवाचन

**प्रश्न ३. पुढीलपैकी कोणत्याही २ कृती सोडवा.** **(६)**

१) टीप लिहा – जिद्दी लेफ्टनंट स्वाती महाडिक

३) टीप लिहा – शब्द तयार होण्याचे विविध प्रकार

३) रेखा मिश्रा यांचे शिक्षण व कार्य लिहा.

## विभाग – ४ भाषाभ्यास

**प्रश्न ४.अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती:** **()**

समास : योग्य जोड्या जुळवा.

| **सामासिक शब्द** | **समास** |
|---|---|
| i) सप्तपदी | i) कर्मधारय |
| ii)पालापाचोळा | ii) द्विगू |
| iii)सुसंवाद | iii) इतरेतर द्वंद्व |
| iv)खरे खोटे | iii) समाहार द्वद्व |
| | v) वैकल्पिक द्वंद्व |

२) **शब्दसिद्धी :** **(१)**

१) ’अंतर’ हा प्रत्यय लावून पुढील शब्द लिहा.

i) रुप – ii) विषय –

२) **दोन अभ्यस्त शब्द लिहा.** i) ii) **(१)**

३) **वाक्प्रचार:** **(४)**

**पुढीलपैकी कोणत्याही २ वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) गुडघे टेकणे ii) माश्या मारणे iii) खस्ता खाणे

iv) शिरोधार्य मानणे

**प्रश्न ४.आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :** **(१)**

**१) शब्द संपत्ती : १) पुढील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.**

i) **कष्ट** ii) **समुद्र**

२) पुढील वाक्यातील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधून लिहा. **(१)**

i) मातीच्या ढिगात सुख–दु:खाचे माणिक,मोती आढळतात.

ii) प्रश्न विचारणाऱ्याला उत्तर हवेच असते,असे नाही.

३) पुढील शब्दांचे वचन बदला. **(१)**

i) फुले – ii) इमारत –

४) पुढील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. **(१)**

खाचखळगे – i) ii)

२) लेखन नियमांनुसार लेखन : **(२)**

पुढील वाक्ये लेखन नियमांनुसार अचुक लिहा. (फक्त दोनच)

i) हीवाळा नूकताच सुरु झाला होता.

ii) चैत्रातल्या पालवीचे रुप कूठेही मनोहर असते.

iii) मला कधिही अहंकारि होऊ देवू नकोस.

iv) शीक्षणामुळे माणूस सूसंकृत होता.

३) विरामचिन्हे : पुढील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरुन वाक्य पुन्हा लिहा. **(१)**

तुमचे केस अजून काळे कसे राहिले आहेत.

४) पारिभाषिक शब्द : पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा. **(१)**

i) Event - ii) Survey -

## विभाग – ५ उपयोजित लेखन

**प्रश्न ५.अ) पुढील कृती सोडवा.** **(६)**

i) पत्रलेखन : पुढील निवेदन वाचा व त्या खालील कोणतीही एक कृती सोडवा.

**वाचनम् हितकारकम्**
**आनंद बुक डेपो**
१०२, विराट नगर, दुकान क्र. ५, शिर्डी
सवलत दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर
दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त खास आकर्षक भेट
कोणत्याही पुस्तकावर २०% सवलत.

वेळ : सकाळी १० ते रात्री ८ संपर्क : ९८१९२२०४१०
सोमवार दुकान बंद राहिल Email : anandbk'D24@gmail.com

रसिक वाचक या नात्याने बुक डेपो मॅनेजरला स्वत:साठी कमीत कमी ५ पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

शाळेच्या ग्रथांलयाचा प्रमुख या नात्याने बुक डेपोच्या मॅरेजरला शाळेसाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत देण्याविषयी विनंती करणारे पत्र लिहा.

**किंवा**

२) सारांश लेखन – विभाग १ : गद्य (इ) (प्रश्न क्र.१) (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ सारांश तुमच्या शब्दात लिहा. **(६)**

(आ) पुढील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.(६० ते ९० शब्दात) **(१०)**

जाहिरात लेखन :– पुढे दिलेल्या विषयाच्या आधारे जाहिरात तयार करा. **(५)**

प्रभाकर ड्रेसस
दादर (पूर्व), टिळक रोड,
शालेय गणवेश सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक
कार्यक्रमासाठी लागणारे ड्रेसेस उपलब्ध
संपर्क : ______ ई–मेल ______

**२) बातमी लेखन : पुढील समारंभाची बातमी तयार करा.** **(५)**

**गणेश विद्या मंदिर, कोपरगावं या शाळेला ७५ वर्षे पूर्ण झाली, त्या निमित्ताच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमास महाराष्ट्राचे माननीय शिक्षण मंत्री श्री. दादा भुसे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

**३) कथा लेखन :- पुढील मुद्यांच्या आधारे कथा लिहा.** **(५)**

रामू कोळी – एकुलता मुलगा धनेश, रामू मासेमारी साठी खोल समुद्रात जाणे. सकाळी गेलेला बाप संध्याकाळ झाली. तरी घरी न येणे. सोसाट्याचा वारा – समुद्राची पूजा करणे– दूरवर होडी दिसणे– पिता पुत्राची भेट. (शीर्षक, तात्पर्य, आवश्यक)

(इ) पुढील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. ()

१) प्रसंग लेखन :- जेव्हा मी रस्ता चुकतो/ते...... या विषयावर खालील मुद्यांच्या आधारे प्रसंगलेखन करा.

- नातेवाईकांकडे जाण्यांचा
- प्रवासात झोप लागणे
- रस्ता चुकणे
- झालेली फजिती
- शोधलेला मार्ग
- मिळालेला धडा

(२) आत्मकथन : पुढील मुद्यांच्या पत्राचे आत्मवृत्त लिहा. ()

- * विद्यार्थ्यांशी अचूक मैत्री
- * डिजिटल माध्यमाचे
- * आक्रमण
- * विविध रुपे
- * पत्र नव्हे मित्र
- * सर्वांना बातम्या देणे
- * 'पत्र' प्रकाशाला महान व्यक्तींची प्रसिद्धी
- * आनंदाचे क्षण
- * चित्रपट, नायक, गाणी यात माझा उल्लेख
- * दु:खाचे क्षण

(३) वैचारीक लेखन :

पुढील मुद्यांच्या आधारे 'स्वच्छ भारत: आजची गरज' या विषयावर निबंध लिहा. ()

- * अस्वच्छता देशासमोरील मोठी समस्या
- * हक्क व कर्तव्ये
- * कडक नियम व कायदे
- * इतर देशांशी तुलना
- * देश माझा ही भावना
- * उपाययोजना
- * सद्याची परिस्थिती
- * स्वयं शिस्त
- * माझी जबाबदारी